# शिवजयंतीनिमित्त पिंपरी मनपातर्फे उद्यापासून प्रबोधन व्याख्यानमाला

पुढारी 15.2.08

पिंपरी : महापालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त प्रबोधन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. थेरगांव, निगडी आणि संभाजीनगर येथे दि. १६ ते १९ दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता सुरु होणाऱ्या या व्याख्यानमालेस नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महापौर अपर्णा डोके यांनी केले आहे.

डांगे चौक, थेरगांव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ दि. १७ रोजी व्याख्यानमालेस सुरुवात होईल. यावेळी प्रा. नितीन बानगुडे पाटील यांचे 'लोककल्याणकारी राजा शिवछत्रपती' या विषयावर व्याख्यान होईल. दि. १८ रोजी सिनेअभिनेते राहूल सोलापूरकर 'प्रतापगड एक मंत्र युध्द' या विषयावर दुसरे पुष्प गुंफतील. तर दि. १९ रोजी प्रसिध्द गीतकार जगदीश खेबूडकर यांचे 'माझ्या चित्रपट गीतांचा प्रवास' या विषयावर व्याख्यान होईल.

चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये दि. १६ पासून शिवजयंती प्रबोधन व्याख्यानमालेस प्रारंभ होईल. व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवशी सिनेअभिनेते राहूल सोलापूरकर 'मला भावलेले राजर्षी' या विषयावर पहिले पुष्प गुंफतील. दि. १७ रोजी योगपंडीत अशोक देशमुख यांचे 'तणाव मुक्ती' या विषयावर तर दि. १८ रोजी प्रा. नितीन बानगुडे पाटील यांचे 'गर्जा महाराष्ट्र माझा' या विषयावर व्याख्यान होईल. दि. १९ रोजी नाट्य तथा सिनेअभिनेते विजय कदम यांचा 'कला जीवनातील गंमती जमती' हा कार्यक्रम सादर होणार आहे.

भक्ती शक्ती चौक, निगडी येथे दि. १६ रोजी प्रबोधन व्याख्यानमालेस प्रारंभ होणार आहे. प्रा. विद्यासागर वाघेरे हे 'संतांची सामाजिक बांधिलकी' या विषयावर पहिले पुष्प गुंफतील. दि. १७ रोजी रोहिदास हांडे यांचे 'मी संभाजीराजा बोलतोय' या विषयावर तर दि. १८ रोजी 'हास्यसम्राट' फेम चैताली माजगावकर (भंडारी) यांचा 'गंमत जंमत' हा विनोदी कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. दि. १९ शाहीर हिंगे यांच्या पोवाड्यांचा कार्यक्रम होईल.

निगडी येथील भक्ती शक्ती उद्यानात शिवजयंती दिनी दि. १९ रोजी सायंकाळी ७ वाजता दीपोत्सव साजरा केल्यानंतर महोत्सवाची सांगता होईल.


आज दि. १२ संध्या. अहमदनगर दि. १८ निगडी, पुणे.
झी मराठी हास्यसम्राट फेम चैताली माजगांवकर-भंडारी
प्रस्तुत




एकपात्री,
दिपात्री,
धमाल गेम शो

संपर्क
सुरेंद्र माजगांवकर
9860913789
9890729972


# 'हास्यभूषण' स्पर्धेत चैताली भंडारी द्वितीय

सातारा (प्रतिनिधी) : येथील नकलाकार सुरेंद्र माजगावकर यांची कन्या सौ. चैताली माजगावकर-भंडारी यांनी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे पुणे फेस्टिवलतर्फे आयोजित 'हास्यभूषण' स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. मानचिन्ह, हास्यभूषण किताब व दोन हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

झी मराठी वाहिनीवरील आगामी 'आयडिया हास्यसम्राट - २' या मालिकेमध्ये तिची निवड झाली. पहिल्या २ फेऱ्या तिने जिंकल्या आहेत.

पुढारी १६/२/८

# खळखळून हास्य अन् टाळ्यांची दाद

पुढारी 14/8/08

PUNE FESTIVAL

पुणे फेस्टिव्हलमध्ये नवकलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळते, हास्यप्रसार हे एक महत्त्वाचे कार्य असून, या कार्यक्रमात मी मुक्तपणे हसलो याचे सारे श्रेय 'हास्यभूषण स्पर्धेला' आहे, असे मनोगत ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी आज व्यक्त केले. पुणे फेस्टिव्हलअंतर्गत हास्यभूषण स्पर्धेत ते बोलत होते.

'तिरक्या तिच्या नजरेवर... बेहद झालो खूष मी... नंतर कळले मला... ती नेहमीच पाहते तशी' या आणि अशा विविध प्रेमाचे किस्से सांगताना राजकर्त्यांची घेतलेली फिरकी, शिक्षणात असलेली उणीव, शहरातील असणाऱ्या विविध समस्यांचे किस्से ऐकताना रसिकांनी खळखळून हसून टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

पुणे फेस्टिव्हलअंतर्गत बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित करण्यात आलेल्या हास्यभूषण स्पर्धेत फारूक सय्यद प्रथम, तर चैताली भंडारी व सुरेश डोंगरे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले. विजयी स्पर्धकांना ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. या वेळी पुणे फेस्टिव्हलचे मुख्य संयोजक कृष्णकांत कुदळे उपस्थित होते. बंडा जोशी, विश्वास पटवर्धन, दिलीप हल्याळ यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.